## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०१/२०१८

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारपीट केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०१/२०१८ चे ०८.३० वाजता. दरम्यान यातील ही गावातील चौकातुन मजुरदार सांगण्याकरीता जात असतांनी नमुद आरोपी याने संगमत करून फिर्यादी सोबत वाद घालुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीचा दिर व सासु यांना थापड बुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडगे गुरनुले पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) प्राण्याना निदर्यतेने वागणुक देवुन ने आण करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०१/२०१८ चे २.३७ वाजता. दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन क्र. ट्रक सी.जी. ०४ जेबी ८४५३ हे साकोली कडुन भंडाराकडे जाणा–या दिशेने एनएच ०६ रोडने तारा ढाबा समोरील मध्ये भागी असलेल्या डिवायडरवर ट्रक चडवीले अशी फोन द्वारे माहीती प्राप्त झाल्याने यातील फिर्यादीने घटनेचे शहानिशा करून यातील ट्रक चालक त्याचे ताब्यातील वाहनामध्ये १५ हेले ३ म्हशी कि.७०,०००/रु. चे भरून मिळुन आलेल्या जणावरांना निर्दयतेची वागणुक देवुन ने आन ने आण करतांनी त्यापैकी ४ हले व १ म्हस मरण पावल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तुमाने यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २८९,४२९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. हेमने पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) चारचाकी वाहनाच्या धडकेत मोटार सायकल स्वार जखमी . :–**

दिनांक २५/०१/२०१८ चे १३.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हे वरील घटना ता वेळी आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६/ पी ०४४५ नी भंडरा कडुन नागपुर कडे डांबरी रोडनी जात असता त्याच्या मागेहुन येणा–या वरील वाहनाने ठोश मारल्याने फिर्यादी हा मोटार सायकलसह पडला त्यामुळे त्याचे पायाचे टोंगऱ्याला ला व उजव्या बाजुचे छातीला किरकोळ मार लागला आहे, व आरोपी हा मोटार सायकलसह पडल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३७ भादंवि. सहकलम १८४,१३४/१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) नगदी पैसे व कागदपत्राची चोरी . :–**

दिनांक २५/०१/२०१८ चे १४. १५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी राजेद्र ज्ञानेश्वर कोंटागले वय २८ वर्ष रा. मंडणगाव बीसीए बॅक ऑफ, गणेश्पुर हे बॅक ऑफ महाराष्ट्र गणेशपुर येथे क्लर्क म्हणुन नोकरीला असुन वरील घटना ता. वेळी त्याचे ३०,०००/ रु. व ड्रायव्हींग लायसन्स,चेक बुक, पॅन कार्ड, आधार कार्ड, व बॅकेचे कागदपत्रे असे कागदपत्रे असलेली बॅग आपल्या स्वतःचे खुर्चीवर ठेवुन कॅश घेण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने वरील पैसे व कागदपत्रे असलेली बॅग चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैधरित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०१/२०१८ चे १०.१५ वाजता. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून आपले ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ६७५८ मध्ये बिना पास परवाना अंदाजे १ ब्रास रेती कि. १०,४००/रु. ची अवैधरित्या चोरून नेतांनी मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ ,३४ भादवी. सहकलम ४८(७),महाराष्ट्र जमीन महसुल अधी. १९५७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) एस.टी. बसच्या धडेकेत एक जखमी . :–

दिनांक २५/०१/२०१८ चे १६. ३० वाजता. दरम्यान यातील जखमी शोभेलाल पारधी वय २५ वर्ष रा. श्रीराम नगर तुमसर हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ०८७९ ने डोंगरला वरून तुमसर कडे येत असतांना विरूध्द दिशने येणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बस ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला धडक देवुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. माहुर्ले यांचे रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कंळबे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

७) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २५/०१/२०१८ चे १७.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा सुमो क्र. एमएच ३५ टी ४०१३ च चालकाने जुना बस स्थानक मोहाडी येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करुन मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. तिवाडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २५/०१/२०१८ चे १२.३५ ते १२.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल कारधा कडुन नागपुर कडे जात असता दारु पिवुन दारुचे नशेतच चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. तिवारी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २५/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी आंधळगाव व लाखांदुर येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १३ लिटर हातभट्टी दारू किंमती ११४०/–रु व ४ लिटर ८६० मिली लिटर देशी दारु किंमती १४०४/–रु. असा एकुण किंमती २५४४/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/०१/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ०८ केसेस व ईतर वाहनांवरती – ६२ केसेस करण्यात आले आहे.

PSC

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.